# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date 26 October 2026
# Time 11.00 to 11.05 AM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

एसटी महामंडळातल्या सुमारे ८३ हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं नोव्हेंबर महिन्याचं वेतन दिवाळीपूर्वी देण्याचे आदेश परिवहन मंत्री आणि एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले. दर महिन्याच्या सात ते दहा तारखेदरम्यान हे वेतन दिलं जातं, पण दिवाळी सहा नोव्हेंबरपासून सुरू होत आहे आणि त्याच्या खरेदीसाठी कर्मचाऱ्यांच्या हातात वेळेवर वेतन पडावं, या उद्देशानं हे पाऊल उचललं आहे.

****

नवरात्रोत्सव आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सुरक्षित अन्न मिळावं आणि अन्नसुरक्षेच्या नियमांचं पालन व्हावं, यासाठी अन्न आणि औषध प्रशासनानं राज्यभरात विशेष तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेत सुमारे १२ कोटी ७४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ६८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूविरोधातल्या कारवाईत २२ गुन्हे दाखल करण्यात आले असून, २० आरोपींना अटक करण्यात आली आहे. अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातल्या सातही विभागांत ही मोहीम राबवण्यात आली. नागरिकांनी सतर्क राहावं आणि कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास प्रशासनाकडे तक्रार करावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

केंद्र सरकारच्या ‘उल्लास नवभारत साक्षरता’ कार्यक्रमांतर्गत राज्यभरात पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी यशस्वीरीत्या घेण्यात आली. या परीक्षेला सुमारे सात लाख परीक्षार्थी बसले होते. परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या

नवसाक्षरांना केंद्र सरकारच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाकडून प्रमाणपत्र आणि गुणपत्रक दिलं जाणार असल्याची माहिती शिक्षण संचालक कृष्णकुमार पाटील यांनी दिली. या प्रमाणपत्राच्या आधारे नवसाक्षरांना पुढील शिक्षणासाठी तिसरी, पाचवी, आठवी, दहावी आणि बारावीच्या परीक्षांना बसता येणार आहे. अशिक्षित व्यक्तींना साक्षर करण्यासाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे.

****

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी काल पाटण्यात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वडिलांबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी करून सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत अशी टीका भाजप नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली आहे. काँग्रेस पक्षानं मोदी किंवा त्यांच्या कुटुंबाविरुद्ध अपमानास्पद भाषेचा वापर केल्याची ही पहिलीच वेळ नाही. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली, काँग्रेस पक्ष दिवसेंदिवस सभ्यतेच्या सीमा ओलांडत चालला आहे असं शहा यांनी म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही खरगे यांच्या विधानावर टीका केली. सहसा काँग्रेस पक्षाच्या बंद दारा आड बोलल्या जाणाऱ्या गोष्टी खर्गे यांनी आवेशात येऊन सार्वजनिक मंचावरून बोलून दाखवल्या त्यामुळे काँग्रेस नक्की काय आहे हे आता देशालाही कळून चुकलं आहे असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

****

राज्यातल्या ७५ साखर कारखान्यांमध्ये २६ लाख मेट्रिक टन उसाचं गाळप पूर्ण झालं आहे. साखर आयुक्तालयाच्या ताज्या अहवालानुसार, पश्चिम महाराष्ट्रातला काही भाग वगळता राज्यातल्या विविध विभागांमध्ये गाळप हंगामाला सुरुवात झाली आहे. २०२६-२७ च्या हंगामासाठी १६३ कारखान्यांना परवाने वितरित केल्याची माहिती साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी दिली.

****

इंडिगो आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून फेब्रुवारी २०२७ पासून आंतरराष्ट्रीय विमान सेवा सुरू करण्याची योजना जाहीर केली. या सेवेचा विस्तार जुलै महिन्यापर्यंत टप्प्याटप्प्यानं केला जाणार आहे. या स्थित्यंतराचा भाग म्हणून इंडिगो, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून दररोज होणारी १२ आंतरराष्ट्रीय उड्डाणं नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर हलवणार आहे.

****

राज्यात एचआयव्ही प्रतिबंध, चाचणी, उपचार, काळजी आणि सहाय्य सेवा अधिक सक्षम आणि परिणामकारक करण्यासाठी ‘मोबिलायझेशन फॉर एड्स सुरक्षा’ हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत अवघ्या सहा महिन्यांत धुळे, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, जालना, चंद्रपूर आणि सांगली या सहा जिल्ह्यांनी तिन्ही उद्दिष्टं साध्य करून ‘सुरक्षित’ श्रेणीत प्रवेश केला आहे. तसंच, राज्यातल्या २३ जिल्ह्यांनी तीनपैकी दोन उद्दिष्टं साध्य करून ‘सक्षम’ श्रेणीत प्रगती केली आहे.

****

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी काल किल्ले धारूर, परळी वैजनाथ आणि केज इथं दुष्काळ निवारणासंबंधी आढावा बैठक घेतली. या बैठकीत पाणीटंचाई व्यवस्थापनासह विविध उपाययोजनांवर चर्चा करुन, ग्रामस्तरीय यंत्रणेला समन्वयानं काम करण्याचं आवाहन करण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या महिला बुद्धिबळ संघाने राजस्थानमधल्या झुंझुनू इथं झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पश्चिम विभागीय महिला बुद्धिबळ स्पर्धेत उपविजेतेपद पटकावलं. आठ फेऱ्यांमध्ये १३ गुणांची कमाई करत संघाने रौप्यपदक जिंकलं.

****